चांगचा घोडा



लेखिका: एलेनॉर
मराठी: अश्विनी बर्वे

चांगचा घोडा





चांग आणि त्याचे आजोबा हॉटेलमधल्या स्वयंपाकघरामध्ये बटाट्याची सालं काढत होते. तेवढ्यात चांग थांबला आणि तो म्हणाला, “घोड्याचा आवाज येतोय” असं म्हणून तो बाहेर दाराकडे धावला.



जर माझ्याकडे घोडा असता तर मी कधीच एकटा पडलो नसतो” तो आजोबा ली यांना म्हणाला. “पुढच्या वर्षी आजोबा म्हणाले, खाण कामगार त्यांच्या कुटुंबाना घेऊन येतील तेव्हा तू एकटा राहणार नाही.” पण चांग ला खात्री वाटत नव्हती. त्याला तो आणि आजोबा सनफ्रान्सिस्कोला आले ते दिवस आठवत होते. त्याला आठवत होते कसे सनफ्रान्सिस्कोच्या काही मुलांनी त्यांच्यावर दगड फेकले होते.



“अमेरिकन मुले आपला द्वेष करतात,” चांग म्हणाला. यावर आजोबांनी मान हलवली आणि म्हणाले, “ते आपला द्वेष करत नाही, तर त्यांना फक्त आपल्याला समजून घेता नाही”

”त्यापेक्षा मला एक टट्टू द्या.
मग मला खऱ्या अर्थाने एक मित्र
मिळेल," चांग म्हणाला.
आजोबा ली हसले, “आता तुला मित्र
आहेत,” ते म्हणाले.
"तुझे शिक्षक आहेत, आणि न्हावी,
आणि लोहार. आणि बिग पीटला
विसरू नकोस.”
"ते आता खेळायला खूप म्हातारे
झाले आहेत," चांग म्हणाला.
"पण मी डॉटीसोबत खेळू शकेन."



आजोबा ली यांनी चुलीच्या वर टांगलेल्या एका चित्राकडे बोट दाखवले,
"आपल्याला परवडणारा हा एकच घोडा आहे," ते म्हणाले.
"आता बटाटे सोलून घे. भुकेले खाणकामगार लवकरच मी केलेला स्वयंपाक खाण्यासाठी, भरपेट जेवणासाठी येतील."





चांगने सांगितल्याप्रमाणे केले.
त्याने टेबलेही लावली.
विहिरीतून पाणी आणले.
आणि चुलीसाठी लाकडे आणली.


पण त्याच्या डोक्यात सतत एकच विचार असायचा, तो म्हणजे त्याच्याकडे एक घोडा असावा.





अडचण

काही खाणकामगार उद्धट होते, त्यांना चांगची वेणी ओढायला आवडायचे. चांग आपली वेणी त्यांच्यापासून लांब ठेवण्याचा प्रयत्न करायचा.



पण तो नेहमीच खाण कामगारांशी नम्रतेने बोलायचा.
जेव्हा ते त्याला त्याचे नाव विचारायचे तेव्हा तो खाली वाकून “माझे नाव चांग आहे,” असे म्हणायचा.

खाण कामगार त्याच्या गुडघ्यावर मारायचे आणि म्हणायचे “तुझ्या डोळ्यांची उघडझाप करू नकोस.” अशा वेळी तो रडायचा तेव्हा ते जोरजोरात हसायचे.

मग चांग स्वयंपाकघरात धावत गेला,
"मला चीनला घरी जायचं आहे," तो
म्हणाला.
आजोबा ली यांनी त्याला त्यांच्या
जवळ घेतले.



"आपण परत जाऊ शकत नाही हे
तुला माहीत आहे," ते म्हणाले.
"चीनमध्ये युद्‌ध सुरू आहे."
"पण ते खाणकामगार... ते इतके
दुष्ट का आहेत?" चांगने विचारले.
आजोबा ली यांनी एक दीर्घ श्वास
घेतला.
"त्यांनी आपलं मन घरीच ठेवलं
आहे," ते म्हणाले.
"त्यांच्या डोक्यात फक्त सोनं आहे.
आणि सोन्याच्या हव्यासाने ते थोडे
वेडे झाले आहेत."




नंतर तो धुळीच्या रस्त्याने अभ्यास करण्यासाठी निघाला. तो घोड्यांच्या तबेल्याजवळ थांबला, “माझ्याजवळ कधी येईल घोडा” त्याने विचार केला. “त्याला मी इथे ठेवेन.”

जेवण झाल्यावर चांगने एका मोठ्या टबमध्ये आंघोळ केली. त्याने त्याची वेणी घट्ट बांधली आणि चांगले स्वच्छ कपडे घातले.



विद्वान सी यो यांनी चांगला इंग्रजी वाचायला आणि लिहायला शिकवले.चांगला त्याचा किती तिरस्कार होता!ते शब्द कागदावर वळवळणाऱ्या कुरूप किड्यांसारखे दिसत होते.





मूल
माणूस
पर्वत
घोडा

चांगला टोकदार कुंचल्याने आणि काळ्या शाईने चिनी शब्द रंगवायला आवडायचे. प्रत्येक शब्द एका चित्रासारखा दिसायचा: त्सु—घोडा. जेन—माणूस, शुन—पर्वत, जेव्हा 'मा'—घोडा—या शब्दावर आला, तेव्हा चांग स्वप्नरंजन करू लागला.

सपॅक!

विद्वान सी यो यांची काठी चांगच्या बारीक पाठीवर जोरात आदळली.

“जर तू खेळणं थांबवलं नाहीस,”

गुरु म्हणाले, “तर तू एक रिकामा बांबू होशील— काही कामाचा राहणार नाहीस.”

चांगने आवंढा गिळला.

त्याला रिकामा बांबू होण्याची भीती वाटत होती.

त्याला फक्त एक घोडा हवा होता.




त्या रात्री चांगने आपल्या उशीला मिठी मारली. त्याने अशी कल्पना केली की ती त्याच्या घोड्याची मान आहे. त्याला जणू घोड्याचे मऊकेस हाताला जाणवत होते. त्याला घोड्याचा श्वासोच्छ्वास ऐकू येत होता.





उंच पीट

उंच पीट जेव्हा गोल्ड डिट्चमध्ये आला, तेव्हा चांगसाठी गोष्टी चांगल्या झाल्या. उंच पीट हा चांगने आजवर पाहिलेला सर्वात उंच आणि सर्वात ताकदवान माणूस होता. त्याने कधीही चांगची वेणी ओढली नाही किंवा त्याला चिडवले नाही.



आता हॉटेल मध्ये
खूप गर्दी होऊ लागली होती.
.

तिथे दररोज खाण मजूर
यायला सुरुवात झाली.



ते सोन्यासाठी पर्वत खोदून
काढत असत. आणि नंतर
मिळालेले सोने नदीत
जाऊन स्वच्छ करत असत.






एक दिवस पीटने चांग ला
सोन्याचा मोठा तुकडा दाखवला.



ते बिल पीटच्या तराजूने सोन्याचे
वजन करत असत.
अशावेळी सोन्याचे बारीक तुकडे
खाली पडत, कामगार फक्त
मोठ्या तुकड्यांकडे लक्ष ठेवत
असत.

तेव्हाच चांगला एक कल्पना सुचली.
"पीट, मला सोनं कसं शोधायचं ते दाखवशील का?" त्याने विचारले.
"मला एक घोडा विकत घेण्यासाठी सोनं लागेल."
पीटने चांगकडे पाहिले, "एका घोड्याला खूप पैसे लागतात," तो म्हणाला.
"कृपया," चांग म्हणाला, "मी तुमची केबिन स्वच्छ करीन आणि तुमची फरशी घासून काढेन."
पीट हसला. "एक काम करूया," तो म्हणाला.
"जर तुझे आजोबा तयार झाले, तर मी तुला उद्या घेऊन जाईन."



चांग हॉटेलकडे धावला आणि आजोबांच्या कमरेला मिठी मारून म्हणाला, “प्लिज प्लिज मला जाऊ द्या ना”

“अंऽऽऽऽऽ” आजोबा म्हणाले.

चांग श्वास रोखून आजोबा काय म्हणतात याची वाट बघत उभा राहिला.

“पण एकदाच” ते म्हणाले,

“काय माहीत तुझे भाग्य उजळून निघेल.”





मग पीटने चांगला घोड्यावर बसवले.
"हा-हा," तो म्हणाला.
ओरडला, आणि ते पुढे निघाले.



सोन्याचा शोध

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर आजोबा ली यांनी चांग आणि पीटसाठी जेवणाचा डबा भरला. चांगने सोनं ठेवण्यासाठी एक पिशवी घेतली.



ते एका मोठ्या खड्डयाजवळ पोहचले. तेव्हा पीटने चांग च्या हातात फावडे आणि बादली दिली. जमीन एकदम खडकाळ होती.

पीटने कुदळीने कठीण खडक फोडला आणि चांगने जमा झालेली माती उकरली आणि भांड्यात भरली.



पीटने चांगला नदीत सोनं कसं
शोधावं हे दाखवलं.
त्याने एका पातेल्यात थोडी
माती टाकली,
मग ते हलवून पाण्यात
बुडवून पाहिलं.
जेव्हा चिखल वाहून गेला,
तेव्हा तिथे वाळू
आणि खडे होते,
पण सोन्याचा एक कणही
नव्हता.

चांग खूप मेहनत करत होता.
सूर्य तापू लागला होता.
त्याच्या चेहऱ्यावरून घामाच्या
धारा वाहत होत्या आणि
त्याच्या हातांना फोड आले होते.
"हळू काम कर, मित्रा," पीट
म्हणाला.
सोनं पळून जाणार नाही."
पण चांग थांबू शकला नाही.
त्याला त्याचा घोडा हवा होता!



अचानक, चांग जोरात ओरडला.
“मिळालं सोनं!”





त्याच्या पातेल्यातील खडयांमध्ये आणि वाळूमध्ये सोन्याचे कण चमकत होते, चांगने ते सर्व काळजीपूर्वक आपल्या पिशवीत ओतले.

तो आणि पीट दौडत गोल्ड डिट्च हॉटेलमध्ये आले. "आता माझा घोडा मला मिळेल!“ चांग ओरडला.



चांगने आपला खजिना स्वयंपाकघरातील टेबलावर पसरवला.
त्याला धूळ उडवायला मदत केली –
जे काही उरले होते त्याकडे टक लावून पाहिलेझाला.



"बकरीसुद्धा विकत घेणार नाही," दुःखाने म्हणाला.
"कधीच घोडा घेता येणार नाही,“ म्हणून चांग नाराज झाला.



खरंच च्या पोनी

सकाळी चांगने आपला शब्द पाळला. त्याने हातात झाडू घेतला आणि पीटची कॅबिन स्वच्छ झाडून काढली.

अचानक त्याला लाकडी फळ्यांमधून काहीतरी चमकताना दिसले. जवळून पाहण्यासाठी चांग गुडघ्यांवर बसला. 'सोनं!' तो पुटपुटला.





ते तुकडे टाचणीच्या डोक्यापेक्षाही लहान होते, पण ते भरपूर होते. कदाचित पुरेसे. त्याने ते सर्व सोनं एकत्र ठेवले आणि घरी पळून गेला. चांग ओरडला, "आता एक विकत घेऊ शकतो. यातून."

"एक घोडा विकत घेऊ शकतो! एका बादलीत सोन्याचे कण टाकूया. आजोबांना दाखवूया, घोडा, नक्कीच!" चांग ओरडला.



आजोबा ली यांनी हसून चांगकडे
पाहिले.
“हे तुला पीटच्या कॅबिनमध्ये सापडले
ते तुला परत करावेच लागेल.
ते आपले नाही.”
चांग्चे घोडा खरेदी करण्याचे स्वप्नं
विरून गेले.

"अरे व्वा!" पीट म्हणाला.
"माझ्या फरशीवर इतकं सोनं आहे
हे मला कधीच माहीत नव्हतं."



पीट सॅक्रामेंटोमधील बँकेत .
सोनं घेऊन गेला.



एक दिवस दुपारच्या वेळी चांग ने पीटच्या घोड्याचा आवाज ऐकला. आजोबांनी त्याला सांगितले पीटचा घोडा आला आहे. तेव्हा तो म्हणाला, “माहीत आहे.” मग तो अगदी हळूहळू दाराकडे गेला.

चांगने घोड्याचे चित्र हातात घेतले आणि त्याचे घोडा घेण्याचे स्वप्न विसरण्याचा प्रयत्न त्याने केला.





पीट त्याच्या घोड्यावर बसून येत होता आणि त्याच्याजवळ अजून एक सुंदर घोडा होता.

“हा तुझा आहे चांग” पीट म्हणाला. “मी हा तुझ्यासाठी खरेदी केला आहे तुझ्या सोन्याच्या भागातून.”

चांग घोड्याजवळ हळूच गेला आणि
त्याने त्याचे ओलसर नाक कुरवाळले.
चांग च्या चेहऱ्यावर मोठे हसू
पसरले. “मला वाटतं त्याला मी
आवडलो आहे.”



मग पीटने चांग ला
घोड्यावर बसायला लावले.





चांग आनंदाने वेडा झाला.
“माझा घोडा” मी तुला पिंगो म्हणेन
असे तो घोड्याच्या कानात कुजबुजला.

“पिंगो माझे तुझ्यावर खूप प्रेम आहे,
मला तू आवडतो.” चांग म्हणाला.
पिंगोने मान हलवली जणू त्याला ते
समजले होते.

लेखकाची नोंद

चीनमधील युद्धे आणि क्रांत्यांमुळे १८५० ते १८६४ दरम्यान हजारो चिनी लोक अमेरिकेत आले. त्यापैकी बरेच जण कॅलिफोर्नियामध्ये आपले नशीब आजमावण्यासाठी आले होते, ज्याला त्यांनी 'गोल्ड मोन' (Gold Mountain) असे नाव दिले होते. काही जण सुतार, शेतकरी, अभियंते, विद्वान आणि डॉक्टर होते. इतरांनी पहिला आंतरखंडीय रेल्वेमार्ग बांधायला मदत केली. या देशात चिनी लोकांना कोणतेही कायदेशीर हक्क नव्हते आणि कधीकधी त्यांच्यावर क्रूरपणे अत्याचार केले जात असत.बिग पीटसारखे अमेरिकन खाणकामगार अनेकदा जमिनीवर सोन्याची धूळ टाकत असत. त्यांच्या केबिनची साफसफाई करणारे चिनी कामगार आनंदाने ती सोन्याची धूळ स्वतःसाठी झाडून घेत असत. जरी चिनी लोकांनी आपल्या देशासाठी, विशेषतः कॅलिफोर्नियासाठी, मोठे योगदान दिले असले तरी, त्या सुरुवातीच्या स्थलांतरितांपैकी फार कमी जणांना ते नशीब मिळाले जे शोधण्यासाठी ते आले होते.